जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे
दैनिक | वर्ष १ | अंक १९३ | सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर भीषण अपघात

**लोणावळा (पुणे), ता. १ :** यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर रविवारी सकाळी एक भीषण अपघात घडला. मुंबईपुणे एक्सप्रेसवेवरील अमृतांजन पुलाजवळ पुण्याहून मुंबईकडे लोखंडी प्लेट घेऊन जाणारा एक अवजड ट्रक अचानक पलटी झाला. या घटनेमुळे महामार्गावर एकच खळबळ उडाली असून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. ट्रक पलटी झाल्याने रस्त्याच्या मधोमध अडथळा निर्माण झाला आणि मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थितीचा आढावा घेत अवजड क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त ट्रक बाजूला करण्याचे काम सुरू केले आहे. गेल्या सुमारे दीड तासापासून ट्रक हटवण्याचे काम सुरू असून, यामुळे वाहतूक पूर्णपणे पूर्ववत होण्यास विलंब होत आहे.

# थेऊर गटात राष्ट्रवादीचे तिन्ही उमेदवार विजयी होणार

## हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर यांचा ठाम निर्धार

## भरघोष मतांनी निवडून देणे हीच अजितदादांना खरी आदरांजली

**लोणी काळभोर, ता. १ :** राज्याचे लाडके नेते, विकासपुरुष उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असली, तरी त्यांच्या विचारांचा वारसा आणि विकासाची दिशा आजही तितक्याच ताकदीने पुढे जात असल्याचे ठाम मत पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य दिलीप वाल्हेकर यांनी व्यक्त केले. अजितदादांनी कधीही पक्ष, जात किंवा विरोधक पाहिला नाही; त्यांनी फक्त विकास पाहिला. त्यामुळे थेऊर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात राष्ट्रवादीचाच विजय होणार, हे काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.





आळंदी म्हातोबाची (ता. हवेली) येथील श्री. म्हातोबा मंदिर परिसरात रविवारी (ता. १) सकाळी अकरा वाजता आयोजित कोपरा सभेत ते बोलत होते. या वेळी हवेली पंचायत समितीच्या माजी सभापती सपना वाल्हेकर, कुंजीरवाडीचे माजी सरपंच संतोषदादा कुंजीर, भगवान जवळकर माजी उपसरपंच अशोक जवळकर वाल्मीक जवळकर, दत्तात्रय जवळकर, शंकर जवळकर, गणेश जवळकर, संदीप पवार, आश्विनी जवळकर, काळूराम भोंडवे, काका माथेफोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभास्थळी कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि विजयाचा आत्मविश्वास दिसून येत होता.

पुढे बोलताना दिलीप वाल्हेकर म्हणाले की, अजितदादांच्या अचानक जाण्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत राजकीय स्थैर्य राखण्यासाठी सुनेत्रा वाहिनी पवार यांना उपमुख्यमंत्री पदाची शपथ घ्यावी लागली. मात्र, विरोधक या संवेदनशील घटनेचे निवडणुकीसाठी भांडवल करत आहेत. अशा संधीसाधू राजकारणाला जनता कधीच साथ देणार नाही. विरोधकांच्या अफवांना आणि अपप्रचाराला कोणीही बळी पडू नये.

ते पुढे म्हणाले, थेऊर, आळंदी म्हातोबाची, कुंजीरवाडी, मांजरी खुर्द, कोलवडी आणि आव्हाळवाडी या गावांमध्ये अजित पवार यांनी विकासाची गंगा वाहिली आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शिक्षण, आरोग्य अशा प्रत्येक क्षेत्रात ठोस काम झाले आहे. आता त्याच विकासाच्या पावलावर पाऊल ठेवत सुनेत्रा वाहिनी पवार हे काम अधिक वेगाने पुढे नेणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि नागरिकांनी डगमगू नये.

थेऊर जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार कोमल संदेश आव्हाळे, आव्हाळवाडी पंचायत समिती गणातून सुषमा मुरकुटे आणि थेऊर पंचायत समिती गणातून युवराज काकडे हे तिन्ही उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात दमदारपणे उतरले आहेत. या तिन्ही उमेदवारांना भरघोष मतांनी निवडून देणे ही अजितदादांना खरी आदरांजली ठरेल, असे आवाहन वाल्हेकर यांनी केले. दरम्यान, नागरिकांचा वाढता प्रतिसाद, कार्यकर्त्यांमधील जोश आणि राष्ट्रवादीची विकासाची विश्वासार्ह परंपरा पाहता, थेऊर गटात विजय हा राष्ट्रवादीचाच होणार, यात शंका नाही, असा ठाम विश्वास सभेच्या शेवटी व्यक्त करण्यात आला.

### जनता आम्हाला निवडून देईल

युवराज काकडे यांनी पुणे प्राईम न्यूजशी संवाद साधताना सांगितले की, अजित दादांचे अपघाती निधन ही अत्यंत दुर्दैवी घटना असून, संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. चार–पाच दिवस प्रचार पूर्णपणे बंद होता. त्यामुळे आम्ही कोणत्याही रॅली किंवा मोठ्या सभा न घेता गावोगावी कोपरा सभा व शोकसभा घेऊन जनतेचा आशीर्वाद मागणार आहोत. जनता आम्हाला निवडून देईल, हीच दादांना खरी श्रद्धांजली ठरेल.

### आता लाडक्या बहिणींना १५०० नाही तर २१०० रुपये

**कोल्हापूर, ता. १ :** शिवसेनेचे नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे झालेल्या जाहीर सभेत लाडक्या बहिणी योजनेवर ठाम भूमिका मांडत मोठं राजकीय आश्वासन दिलं. एकनाथ शिंदे शब्दाचा पक्का आहे. लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय मी थांबणार नाही. लवकरच त्यांना दरमहा २१०० रुपये दिले जातील, असं सांगत त्यांनी शिवसेनेच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचं आवाहन केलं. महिला मतदारांवर भर देत शिंदे म्हणाले, ज्या उमेदवाराच्या पाठीशी महिला उभ्या राहतात, त्याचाच नंबर पहिला लागतो. दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज तुमच्याकडे मतांची विनंती करायला आला आहे, असं भावनिक आवाहन त्यांनी केलं. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका या पक्षाचा पाया मजबूत करणाऱ्या असतात, त्यामुळे या निवडणुकांकडे गांभीर्याने पाहणं गरजेचं आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. सभेच्या सुरुवातीला त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन केलं. अशा दुःखाच्या काळातही प्रचारासाठी बाहेर पडावं लागतं, कारण निवडणुका पुढे ढकलता येत नाहीत. मात्र, प्रचार करताना कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची काळजी आम्ही घेतो, असं शिंदे यांनी सांगितलं.

# ग्रामीण भागातील आरोग्य सेवांना प्राधान्य देणार : राष्ट्रवादीच्या उमेदवार सुरेखा हरगुडे

**उरुळी कांचन, ता. १ :** ग्रामीण भागातील आरोग्यव्यवस्था ही आजही गंभीर आव्हान ठरत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये पुरेशा सुविधा, डॉक्टरांची उपलब्धता आणि वेळेवर उपचार मिळणे गरजेचे आहे. कोरेगाव मूळ-केसनंद जिल्हा परिषद गटातील रुग्णांना पुण्यावर अवलंबून राहावे लागते, ही स्थिती बदलण्यासाठी स्थानिक पातळीवर सक्षम आरोग्य सुविधा उभारण्यावर भर देणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सुरेखा रमेश हरगुडे यांनी नायगाव (ता. हवेली) येथे केले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी पूर्व हवेली परिसरात केलेल्या भरीव विकासकामांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना जनतेचा मोठा आणि विश्वासपूर्ण पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. याच विकासाच्या जोरावर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास हरगुडे यांनी पुणे प्राईम न्यूजशी बोलताना व्यक्त केला.

हरगुडे पुढे म्हणाल्या की, कोरेगाव मूळ गणातून कृषिराज उर्फ मनोज चौधरी हे आरोग्य, शेतकरी प्रश्न, महिला सक्षमीकरण, नागरी सुविधा व समाजकल्याण या मूलभूत विषयांवर ठोस आणि परिणामकारक काम करीत आहेत. तर केसनंद गणातून माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य प्रमोद चंद्रकांत हरगुडे हे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून,



जबाबदारीने काम करीत आहेत. त्यांच्या पाच वर्षाच्या काळात पाणीपुरवठा, वीज, रस्ते, ड्रेनेज यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

जनतेवर प्रेम करणे आणि त्या प्रेमातून सेवा घडवणे, हाच राजकारणाचा खरा उद्देश आहे, असे ठाम मत व्यक्त करत महिला सक्षमीकरण हे केवळ भाषणापुरते न ठेवता प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची गरज आहे. महिला बचत गटांना आर्थिक पाठबळ, स्वयंरोजगाराच्या संधी, आरोग्य तपासण्या आणि सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना राबवण्यात येतील असेही हरगुडे यांनी सांगीतले.

दरम्यान, नागरी सुविधांच्या बाबतीत स्वच्छ पाणीपुरवठा, दर्जेदार रस्ते, अखंड वीजपुरवठा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन या प्रश्नांवर प्राधान्याने काम केले जाईल. तसेच समाजकल्याण विभागाच्या योजनांचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी पारदर्शक, जबाबदार आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्याचे ठोस आश्वासनही सुरेखा हरगुडे यांनी यावेळी दिले.

# कोरेगाव मूळ–केसनंद गटातील राष्ट्रवादीचे तिन्ही उमेदवार निवडून येणार : अमोल चौधरी

## प्रचार फेऱ्या, बैठका आणि जनसंवाद कार्यक्रमांमधून नागरिकांकडून वाढता पाठिंबा

**उरुळी कांचन, ता. ३० :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव मूळ-केसनंद गटात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिन्ही उमेदवारांना नागरिकांकडून उत्स्फुर्त आणि भक्कम प्रतिसाद मिळत असून, तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येणार असल्याचा ठाम विश्वास नायगाव (ता. हवेली) येथील सामाजिक कार्यकर्ते अमोल चौधरी यांनी व्यक्त केला जात आहे.

कोरेगाव मूळ-केसनंद गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा परिषदेच्या उमेदवार सुरेखा रमेश हरगुडे, कोरेगाव मूळ गणातील कृषिराज उर्फ मनोज दत्तात्रय चौधरी, व केसनंद गणातून माजी सरपंच व विद्यमान सदस्य प्रमोद



चंद्रकांत हरगुडे यांना प्रचार फेऱ्या, बैठका आणि जनसंवाद कार्यक्रमांमधून नागरिकांकडून मिळणारा वाढता पाठिंबा मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने तिन्ही उमेदवार मोठ्या मतांनी निवडणून येणार आहेत.

ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या आणि विकासाचा ठोस अजेंडा मांडणाऱ्या उमेदवारांना जनतेचा विश्वास मिळत आहे. विशेषतः आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, वीज, शेती, महिला सक्षमीकरण आणि समाजकल्याण या मुद्द्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी मांडलेली भूमिका नागरिकांना भावली आहे.

कोरेगाव मूळ-केसनंद परिसरात आजही आरोग्य सुविधांचा अभाव असून रुग्णांना उपचारांसाठी पुण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्थानिक पातळीवर सक्षम आरोग्य सुविधा उभारण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे सक्षम करणे, डॉक्टरांची नियमित उपलब्धता आणि वेळेवर उपचार मिळावेत यासाठी ठोस पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. केवळ घोषणाबाजी नव्हे, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी हेच या उमेदवारांचे वैशिष्ट्य असल्याचे काही नागरिक सांगत आहेत. शेती व शेतकरी प्रश्नांबाबत पाणी व्यवस्थापन, वीजपुरवठा, रस्ते आणि बाजारपेठेशी जोडणी यावर भर देण्याचा निर्धार करण्यात आला आहे. तसेच नागरी सुविधांमध्ये स्वच्छ पाणीपुरवठा, दर्जेदार रस्ते, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन या प्रश्नांना प्राधान्य दिले जाणार आहे. दरम्यान, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी पूर्व हवेली भागात केलेल्या विकासकामांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल जनतेत विश्वास निर्माण झाला असून, याच विकासाच्या जोरावर तिन्ही उमेदवार विजयी होतील, असा विश्वास कार्यकर्ते आणि नागरिक व्यक्त करत आहेत.

# हडपसर येथील बी. टी. कवडे रोड परिसरात शस्त्रधारी टोळक्याचा धुमाकूळ

**पुणे, ता. १ :** पुणे शहराच्या पूर्व भागात पुन्हा एकदा गुंडगिरीने डोके वर काढले असून, हडपसर येथील बी. टी. कवडे रोड परिसरात शनिवारी रात्री शस्त्रधारी टोळक्याने रस्त्यावर उघड दहशत माजवली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, स्थानिक रहिवाशांची झोप उडाली आहे.

रात्रीच्या शांत वेळेत अचानक चार तरुण आणि एका तरुणीचा समावेश असलेले टोळके हातात कोयते व धारदार हत्यारे घेऊन रस्त्यावर उतरले. तोंडाला कापड बांधून त्यांनी रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना व वाहनचालकांना धमकावत शस्त्रांचा धाक दाखवला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे रस्त्यावर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असून, नागरिकांनी जीव वाचवण्यासाठी मिळेल त्या दिशेने पळ काढला.




टोळक्याने केवळ दहशत निर्माण करून न थांबता रस्त्यालगत असलेल्या अर्धा डझनहून अधिक दुकानांवर कोयत्याने वार करत शटर व काचा फोडल्या. यासह रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांचीही मोठ्या प्रमाणावर तोडफोड करण्यात आली. या घटनेत व्यापाऱ्यांचे व वाहनमालकांचे लक्षणीय आर्थिक नुकसान झाले आहे.

या प्रकरणातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे टोळक्यातील एका तरुणीचा सक्रिय सहभाग. आतापर्यंत पुण्यात कोयता गँगसारख्या गुन्हेगारी घटनांमध्ये प्रामुख्याने तरुण पुरुषांचा सहभाग दिसून येत होता; मात्र, एका तरुणीनेही हातात शस्त्र घेऊन उघडपणे दहशत निर्माण केल्याने पोलिस यंत्रणेसह समाजालाही हा प्रकार धक्कादायक ठरला आहे. त्यामुळे परिसरात कोयता गँगचे लेडी डॉन व्हर्जन अशी चर्चा रंगली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे.

दरम्यान, हडपसर परिसरात वारंवार घडणाऱ्या अशा गुंडगिरीच्या घटनांमुळे पुणेकरांच्या मनात सुरक्षिततेबाबत भीती निर्माण झाली असून, शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# लोणी काळभोर गटात राष्ट्रवादीचा विजय जवळपास निश्चित; माजी उपसरपंच आणणासाहेब काळभोर

**लोणी काळभोर, ता. १ :** लोणी काळभोर परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने होम टू होम प्रचाराची रणनिती प्रभावीपणे राबवण्यास सुरुवात केली असून, या प्रचाराला नागरिकांकडून उत्स्फुर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. एकेक घर गाठत मतदारांशी थेट संवाद साधला जात असल्याने, ही प्रचारपद्धत जनतेच्या मनाला भावताना दिसत आहे. एकूण वातावरण पाहता लोणी काळभोर जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांमध्ये राष्ट्रवादीचा विजय जवळपास निश्चित आहे. असे प्रतिपादन माजी उपसरपंच अण्णासाहेब गणपत काळभोर यांनी केले आहे.

पुढे बोलताना आण्णासाहेब काळभोर म्हणाले की, राज्याचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री कै. अजित दादा पवार यांनी लोणी काळभोरसह संपूर्ण जिल्ह्यात विकासकामांची भक्कम पायाभरणी केली. पाणीपुरवठा, रस्ते, पूल, शिक्षण व मूलभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत अजित दादांनी कोणताही पक्षभेद न ठेवता विकासाची गंगा वाहिली. त्यामुळे लोणी काळभोर गटात अजित दादांना मानणारा, त्यांच्यावर नितांत विश्वास ठेवणारा मोठा जनसमूह आजही ठामपणे राष्ट्रवादीच्या पाठीशी उभा आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीतच अजित दादांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. या दुःखद



घटनेनंतर पक्षश्रेष्ठींनी सभा न घेता थेट मतदारांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत राष्ट्रवादी काँग्रेसने होम टू होम प्रचाराचा मार्ग अवलंबला असून, तो अत्यंत प्रभावी ठरत आहे.

प्रचारादरम्यान नागरिक अजित दादांच्या आठवणींना उजाळा देत भावनिक होताना दिसत आहेत. अजित दादांनी आमच्यासाठी जे केले, ते कोणीच केले नाही, अशी भावना अनेक घरांमधून व्यक्त होत आहे. रामदरा पूल, पिण्याच्या पाण्याचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न, रस्ते विकास यांसारख्या महत्वाच्या प्रश्नांना अजित दादांनी मार्गी लावले. त्यामुळे लोणी काळभोरच्या जनतेवर त्यांचे उपकार कायमस्वरूपी कोरले गेले आहेत.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातील उमेदवार शीतल सुजित कांबळे, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातील रेश्मा युवराज काळभोर तसेच कदम वाकवस्ती गणातील अमोल टेकाळे या तिन्ही उमेदवारांना मतदारांकडून मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. घराघरांतून होत असलेला प्रतिसाद पाहता, हे तिन्ही उमेदवार भरघोस मतांनी निवडून येणार आहेत. असे आण्णासाहेब काळभोर यांनी सांगितले आहे.

दरम्यान, लोणी काळभोरमध्ये राष्ट्रवादीचा प्रचार केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून, तो कै. अजित दादा पवार यांच्या कार्याला आणि त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्याचा एक भावनिक प्रवास ठरत आहे. जनता राष्ट्रवादीला मतदान करून अजित दादांच्या कार्यावर शिक्कामोर्तब करणार, हे मात्र आता निश्चित होत चालले आहे.

# पुण्यात कोयता गँगमध्ये लेडी डॉनची एन्ट्री; तोंडाला मास्क लावून कोयते नाचवले

## दुकानं फोडली; हडपसर परिसरात धुमाकूळ

**पुणे, ता. १ :** पुणे शहरात कोयता गँगची दहशत पुन्हा एकदा उफाळून आली असून, शनिवारी रात्री हडपसर भागातील बी. टी. कवडे रस्ता परिसरात घडलेल्या घटनेने नागरिकांमध्ये तीव्र भीती पसरली. भरवस्तीत हातात कोयते घेऊन थेट रस्त्यावर उतरलेल्या टोळीने काही मिनिटांतच संपूर्ण परिसर गोंधळात टाकला. आरडाओरडा, धमक्या आणि तोडफोड यामुळे रात्रीचा शांत परिसर अचानक दहशतीखाली गेला.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास चार तरुण आणि एक महिला अशी टोळी तोंडाला मास्क लावून बी. टी. कवडे रस्त्यावर आली. हातात धारदार कोयते नाचवत त्यांनी रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना थांबवण्याचा,



घाबरवण्याचा प्रयत्न केला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे अनेकांनी आपली वाहने सोडून पळ काढला, तर काही जणांनी दुकानांत आश्रय घेतला.

यानंतर टोळीने आपला रोख थेट दुकानांकडे वळवला. रस्त्यालगत असलेल्या सहा दुकानांच्या शटरवर आणि काचांवर कोयत्याने वार करत त्यांनी मोठे नुकसान केले. इतक्यावरच न थांबता, रस्त्यावर उभ्या असलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांवरही हल्ला करण्यात आला. वाहनांच्या काचा फुटल्याने व्यावसायिकांसह स्थानिक रहिवाशांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या कोयता गँगमध्ये एका महिलेचाही सक्रिय सहभाग असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. पुण्यात आतापर्यंत कोयता गँग म्हटले की तरुण मुलांचेच चेहरे समोर येत होते. मात्र, या घटनेमुळे गुन्हेगारीचे बदलते स्वरूप आणि तरुणीही या हिंसक प्रवाहाकडे वळत आहेत का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

बी. टी. कवडे रस्ता हा दाट लोकवस्तीचा आणि वाहतुकीने गजबजलेला भाग आहे. अशा ठिकाणी उघडपणे शस्त्रसज्ज टोळी धुमाकूळ घालते, यावरून कायदा-सुव्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उभे राहते. पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून आरोपींचा शोध सुरू आहे. मात्र, या घटनेने पुणेकरांच्या मनातील सुरक्षिततेची भावना पुन्हा एकदा हादरवली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा प्रचार न करण्याचा निर्णय

**मुंबई, ता. १ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचारात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. या निवडणुकांमध्ये स्थानिक नेते आणि पदाधिकारी प्रचाराची जबाबदारी सांभाळणार असून, मुख्यमंत्री फडणवीस स्वतः कोणतीही प्रचारसभा घेणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी ५ फेब्रुवारीपर्यंत प्रचाराचा कालावधी देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सात दिवसांत २२ प्रचारसभा नियोजित होत्या. मात्र, अजित पवार यांच्या निधनामुळे त्यांनी सर्व सभा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखांमध्ये बदल केला आहे.

## संक्षिप्त



### पुण्यात तरुणी घरी एकटी असल्याचा फायदा घेत शरीरसुखाची मागणी

**पुणे, ता. १ :** पुणे शहरात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. हडपसरमधील लक्ष्मीनगर परिसरात एका वर्षीय नराधमाने मद्यधुंद अवस्थेत एका तरुणीच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना घडली आहे. पीडित तरुणीने दाखवलेल्या धैर्यामुळे पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हडपसरमधील लक्ष्मीनगर भागात पीडित तरुणी आपल्या घरात एकटीच होती. हीच संधी साधून आरोपी कुणाल सोपान गायकवाड (रा. बडकीनाला, हडपसर) हा दारूच्या नशेत धुत होऊन तिच्या घरात शिरला. त्याने तरुणीसोबत अश्लील वर्तन करण्यास सुरुवात केली आणि तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली. अचानक ओढवलेल्या या प्रसंगामुळे तरुणी प्रचंड हादरली होती. स्वतःचा बचाव करण्यासाठी पीडितेने आरडाओरडा केला, मात्र आरोपीवर त्याचा कोणताही परिणाम झाला नाही. त्याने तिची छेड काढणे सुरूच ठेवले. या भीषण प्रकारानंतर पीडितेने पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार नोंदवली. लक्ष्मीनगर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपी कुणाल गायकवाडला बेड्या ठोकल्या. आरोपीने हे कृत्य मद्यधुंद अवस्थेत केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

### किरकोळ कारणावरुन झालेल्या मारामारीत एकाचा मृत्यू

**पुणे, ता. १ :** पुणे शहर सध्या गुन्हेगारीच्या घटनांनी हादरत आहे. कात्रज भागातील भारती विद्यापीठ परिसरात केवळ 'एकमेकांकडे पाहण्यावरून' झालेल्या वादात सौरभ संजय शिखरे या वर्षीय तरुणाला आपले प्राण गमवावे लागले आहेत. अंडाभुर्जीच्या गाडीवर झालेली ही किरकोळ बाचाबाची एका कुटुंबाचा आधार हिरावून नेणारी ठरली आहे. सौरभ घटनेच्या दिवशी रात्री आपल्या मित्रांसोबत बाहेर गेला होता. पहाटे अडीचच्या सुमारास भूक लागल्याने ते भारती विद्यापीठाच्या मागील गेटजवळील एका अंडाभुर्जीच्या गाडीवर थांबले. तिथेच आरोपी तेजस सणस आणि त्याचे मित्रही उपस्थित होते. 'तू माझ्याकडे असं का पाहतोयस?' या अतिशय क्षुल्लक कारणावरून दोन्ही गटात आधी शाब्दिक चकमक उडाली आणि त्याचं रूपांतर भीषण हाणामारीत झालं. आरोपींनी सौरभला इतकी बेदम मारहाण केली की, खाली पडल्यामुळे त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. सौरभला त्याच्या मित्रांनी जखमी अवस्थेत घरी सोडलं होतं, मात्र सकाळी तो बेशुद्ध आढळल्याने खळबळ उडाली. नऱ्हे येथील रुग्णालयात चार दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर डिसेंबरला त्याची प्राणज्योत मालवली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि माहितीच्या आधारे वर्षीय तेजस सणसला बेड्या ठोकल्या.

# इतक्या मोठ्या नेत्याचा अंत असा अचानक व्हावा, हे मनाला पटत नाही : रुपाली पाटील ठोंबरे

**पुणे, ता. १ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीसह संपूर्ण राज्यात शोककळा पसरलेली असतानाच, या घटनेभोवती आता गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि माजी नगरसेविका रुपाली पाटील ठोंबरे यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमुळे मृत्यूच्या पार्श्वभूमीवर चौकशीची मागणी ऐरणीवर आली आहे.

रुपाली पाटील यांनी फेसबुक पोस्टमध्ये अजित पवार यांच्या अचानक जाण्याने आपण मानसिकदृष्ट्या हादरल्याचं नमूद केलं आहे. कसे झाले, का झाले, काहीच कळत नाही. इतक्या मोठ्या नेत्याचा अंत असा अचानक व्हावा, हे मनाला



पटत नाही, असं त्या म्हणतात. विशेषतः प्रवासादरम्यान घडलेल्या घटनांकडे लक्ष वेधत त्यांनी गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. नियोजित वेळेत असलेल्या फ्लाइटसाठी दोन्ही पायलट एकाचवेळी उशिरा पोहोचणे, अचानक पायलट बदल आणि त्यानंतरच्या सुरक्षा प्रक्रियेबाबतची माहिती सार्वजनिक न होणे या सगळ्यांमुळे घात की अपघात? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. या संपूर्ण घटनेची सखोल, पारदर्शक चौकशी व्हावी, अशी त्यांची मागणी आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात आणखी एक विषय चर्चेत आला. सुनेत्रा पवार यांचा घाईघाईत पार पडलेला शपथविधी. अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या तीन दिवसांत उपमुख्यमंत्रिपदाची शपथ का घेण्यात आली, याबाबत अनेक तर्कवितर्क सुरू झाले. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीतील भाजप नेतृत्वाला संभाव्य राजकीय पेच टाळायचा होता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणावर चर्चा सुरू असताना, अजित पवार यांच्या निधनानंतर सत्ताकेंद्र शरद पवारांकडे जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. हे टाळण्यासाठी सुनेत्रा पवार यांच्याकडे तातडीने पक्षाची सूत्रे देण्याचा निर्णय घेण्यात आला, असं सांगितलं जातं.

राष्ट्रवादीतील काही कार्यकर्त्यांनी या शपथविधीवर टीका केली असली, तरी आमदारांमधील अस्वस्थता, अफवा आणि नेतृत्वाबाबतचा गोंधळ दूर करण्यासाठी हा निर्णय अपरिहार्य होता, असं पक्षातील निकटवर्तीयांचं म्हणणं आहे.

एकीकडे अजित पवार यांच्या मृत्यूभोवती चौकशीची मागणी, तर दुसरीकडे सत्तेतील तातडीचे निर्णय या दोन्ही घडामोडी राज्याच्या राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या ठरणार आहेत.

# सुनेत्रा पवारांकडे सोपवल्या आणखी दोन मोठ्या जबाबदाऱ्या

**मुंबई, ता. १ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्र अजूनही सावरलेला नसतानाच, राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. अजितदादांचा राजकीय वारसा पुढे नेण्यासाठी आता त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार सज्ज झाल्या आहेत. शुक्रवारी रात्री उशिरा त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारण्यास होकार दिला असून, आज त्यांचा शपथविधी सोहळा पार पडणार आहे.

अजितदादांच्या जाण्याने केवळ कुटुंबातच नव्हे, तर पक्षात आणि सत्तेत मोठी पोकळी निर्माण झाली होती. ही पोकळी भरून काढण्यासाठी सुनेत्रा पवार आपल्या दोन्ही मुलांसह (पार्थ आणि जय पवार) मुंबईतील 'देवगिरी' बंगल्यावर दाखल झाल्या आहेत. सुनेत्रा पवार केवळ उपमुख्यमंत्रीच होणार नाहीत, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित



पवार गट) राष्ट्रीय अध्यक्षपदाची सूत्रेही त्यांच्याकडेच राहतील, अशी दाट शक्यता आहे.

सुनेत्रा पवार यांच्याकडे क्रीडा आणि राज्य उत्पादन शुल्क ही दोन महत्त्वाची खाती सोपवली जाणार आहेत. मात्र, राजकारणातील सर्वात मोठी चर्चा ही 'अर्थखात्या'ची आहे. अनेक वर्षांपासून अजितदादांकडे असलेले वित्त आणि नियोजन (अर्थखाते) आता भाजपकडे जाणार असल्याची माहिती आहे. दादांनी या अर्थसंकल्पाची (बजेट) जय्यत तयारी केली होती, परंतु आता हे बजेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः सादर करण्याची शक्यता आहे.

# वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांचे निधन

**लोणीकंद, ता. १ :** पुणे पोलीस दलातील एक अभ्यासू, कर्तव्यदक्ष म ानले जाणारे लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांचे आज पहाटे दोनच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. एका कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याने अशी अचानक एक्झिट घेतल्याने केवळ पोलीस दलातच नव्हे, तर संपूर्ण हवेली तालुक्यात शोककळा पसरली आहे. सर्जेराव कुंभार यांनी लोणीकंद पोलीस ठाण्याची सूत्रे हाती घेतल्यापासून या परिसरातील चित्र पूर्णपणे बदलले होते. गुन्हेगारांमध्ये त्यांचा दबदबा इतका मोठा होता की, त्यांचे नाव ऐकताच सराईत गुन्हेगारांचेही धाबे दणाणायचे. अवैध धंदे, वाळू माफिया आणि स्थानिक गुंडगिरी मोडून काढण्यात त्यांचा मोठा वाटा होता. केवळ कडक शिस्तच नाही, तर नागरिकांच्या तक्रारीवर तातडीने प्रतिसाद देणारा अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. सामान्य माणसाचा एक फोन गेला तरी ते स्वतः दखल घेत असत, ज्यामुळे



पोलिसांवरील लोकांचा विश्वास वाढला होता.

पुणे शहर आयुक्तालयांतर्गत लोणीकंद पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र अत्यंत आव्हानात्मक आहे. मात्र, कुंभार साहेबांनी तिथे केवळ गुन्हेगारीच रोखली नाही, तर पोलीस ठाण्याच्या कामकाजातही मोठे सकारात्मक बदल घडवून आणले होते. कर्मचाऱ्यांसाठी ते एक मार्गदर्शक आणि आधारस्तंभ होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी सिद्धी (बी.ए.एम.एस.चे शिक्षण घेत आहे), मुलगा सिद्धेश आणि मोठा भाऊ असा परिवार आहे. त्यांचे मूळ गाव कोल्हापूर येथे असून, तिथेच त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

# शेतकऱ्यांसाठी मोठी बातमी! केंद्रीय अर्थसंकल्पात शेतीला दिलासा

**मुंबई, ता. १ :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदेत देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाकडे देशभरातील शेतकरी, कृषी क्षेत्राशी संबंधित घटक आणि ग्रामीण भागाचे विशेष लक्ष होते. शेती आणि संलग्न व्यवसायांना चालना देण्यासाठी सरकारकडून काही महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या असून, शेतकऱ्यांसाठी हा अर्थसंकल्प दिलासादायक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्र्यांनी सांगितले की, हा अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने नेणारा आहे. गेल्या १२ वर्षांपासून नियोजनबद्ध पद्धतीने देशाचा कारभार सुरू असून उत्पादन क्षमता वाढत आहे. नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी विविध पातळ्यांवर काम सुरू आहे. दारिद्र्य कमी करण्यासाठी केलेले प्रयत्न सकारात्मक ठरत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यामध्ये कृषी क्षेत्राला महत्त्व देण्यात आले आहे.

या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी अनेक उपक्रमांची घोषणा करण्यात आली आहे. कापूस उत्पादन वाढवण्यासाठी नवीन योजना राबवली जाणार आहे. मत्स्य व्यवसाय आणि पशुपालन क्षेत्राला चालना देण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जाणार आहेत. मत्स्य पालनासाठी देशभरात ५०० अमृत जलाशय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच नारळ, चंदन आणि काजू यांसारख्या पिकांचे उत्पादन वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. भारतातील काजू आणि कोकोला जागतिक बाजारपेठेत ब्रँड म्हणून ओळख मिळवून देण्याचा मानस सरकारने व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा यासाठी बहुभाषिक एआय आधारित साधन विकसित केले जाणार आहे.

अर्थसंकल्पापूर्वी शेतकऱ्यांच्या अनेक अपेक्षा होत्या. महागाई, हवामान बदल आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे कृषी क्षेत्रावर ताण वाढला आहे. त्यामुळे कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी अधिक आर्थिक तरतूद होईल, अशी मागणी केली जात होती. हवामान बदलाला तोंड देणारी शेती, पीक विविधीकरण आणि मूल्यवर्धन यासाठी नव्या योजना जाहीर होतील, अशी अपेक्षाही होती.

# अंबाजोगाई तालुक्यात महिलेला नोकरीचे आमिष दाखवून बलात्कार

**बीड, ता. १ :** अंबाजोगाई तालुक्यात नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत एका २८ वर्षीय सहशिक्षिकेचा दीर्घकाळ लैंगिक छळ केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. तब्बल तीन वर्षांपेक्षा जास्त काळ हा छळ सुरू असल्याचा आरोप असून, पीडितेला अश्लील फोटो आणि व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी देत मानसिक दबाव टाकण्यात आला होता. अखेर या त्रासाला कंटाळून पीडित महिलेने अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणात एकाच कुटुंबातील चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला एका शाळेत सहशिक्षिका म्हणून कार्यरत आहे. मोहीन बासद शेख या मुख्य



आरोपीने तिला चांगल्या नोकरीची संधी मिळवून देतो, असे सांगत तिच्याशी ओळख वाढवली. विश्वास संपादन केल्यानंतर त्याने विविध कारणे सांगून तिच्यावर दबाव टाकत शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले. या काळात त्याने तिचे खासगी फोटो आणि व्हिडिओ तयार केल्याचा आरोप आहे.

यानंतर हे फोटो आणि व्हिडिओ समाजमाध्यमांवर टाकण्याची धमकी देत आरोपीने वारंवार तिचा छळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. हा प्रकार अनेक वर्षे सुरू राहिल्याने पीडित महिला प्रचंड मानसिक तणावात होती. दरम्यान, तिच्या पतीला संशय आल्यावर त्यांनी चौकशी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मुख्य आरोपीसह त्याचे भाऊ बाबा शेख, इरशाद शेख आणि मोसीन शेख यांनी एकत्र येत पतीला शिवीगाळ केली आणि पुन्हा विचारणा केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

सततच्या धमक्या, अपमान आणि मानसिक छळामुळे अखेर ३० जानेवारी रोजी पीडितेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक जाधव करत असून सर्व आरोपींच्या भूमिकेचा सखोल तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात चिंता व्यक्त होत असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घराबाहेर गोळीबार करणारे अटकेत

## पुणे कनेक्शन उघड, ४ आरोपी जेरबंद

**मुंबई, ता. १ :** प्रसिद्ध अभिनेता आणि दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात आता मोठी कारवाई करत पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे. हे सर्व आरोपी पुणे शहरातील वेगवेगळ्या भागांतून पकडण्यात आले असून, त्यांना पुढील तपासासाठी मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

मुंबईतील जुहू परिसरात रोहित शेट्टी यांचे वास्तव्य आहे. हा परिसर अत्यंत सुरक्षित आणि उच्चभ्रू मानला जातो. शेट्टी टॉवर्स नावाच्या दहा मजली इमारतीत अनेक बॉलिवूडमधील नामवंत कलाकार राहतात. त्यामुळे येथे कायमच पोलिसांची आणि खासगी सुरक्षेची व्यवस्था असते. असे असतानाही रात्री उशिरा या इमारतीबाहेर चार गोळ्या झाडण्यात आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच मुंबई पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. परिसराला वेढा देण्यात आला आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी तपास सुरू करून पुरावे गोळा केले. प्राथमिक पाहणीत गोळीबार इमारतीच्या बाहेरून झाल्याचे समोर आले.

दरम्यान, तपासात पुणे पोलिसांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पुण्यातील धायरी, वारजे आणि कर्वेनगर परिसरात छापे टाकून चार संशयितांना अटक करण्यात आली. या आरोपींच्या हालचाली आणि संपर्क संशयास्पद असल्याचे पोलिसांना आढळून आले. चौकशीत त्यांचे मुंबईतील गुन्हेगारी टोळ्यांशी संबंध असल्याचे प्राथमिक संकेत मिळाले आहेत.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या चौघांचे देशातील कुख्यात गँगशी संबंध असण्याची शक्यता तपासली जात आहे. पुणे पोलिसांनी सर्व आरोपी मुंबई क्राइम ब्रांचकडे सुपूर्द केले असून, पुढील सखोल तपास सुरू आहे.

या गोळीबाराच्या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. तसेच कोणालाही दुखापत झाली नसल्याने पोलिसांनी दिलासा व्यक्त केला आहे. मात्र, या प्रकारामुळे शहरातील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# सुनेत्रा पवार मुंबईत दाखल होताच सुप्रिया सुळे अजितदादांच्या निवासस्थानी

**मुंबई, ता. १ :** अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर राज्याच्या राजकारणात निर्माण झालेल्या पोकळीने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असताना, आज राजकीयदृष्ट्या अत्यंत नाट्यमय आणि महत्त्वाची घडामोड घडली. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी शोकाकुल वातावरणात महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. हा सत्ताबदल केवळ भावनिक नसून, राज्याच्या सत्ताकारणावर दूरगामी परिणाम करणारा असल्याचे मानले जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वाधिक प्रभावी नेते, बारामतीचे राजकीय केंद्रबिंदू आणि राज्याच्या सत्तेतील निर्णायक चेहरा म्हणून ओळख



असलेल्या अजित पवार यांच्या निधनामुळे पक्षासमोर नेतृत्वाचा तातडीचा प्रश्न उभा राहिला. महायुती सरकारची स्थिरता राखणे आणि प्रशासनातील निर्णयक्षमता टिकवून ठेवणे आवश्यक असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची मुंबईत तातडीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली. त्यानंतर काही तासांतच राजभवनात त्यांचा शपथविधी पार पडला.

पक्षाकडून सुनेत्रा पवार यांच्या निवडीला केवळ सहानुभूतीचा निर्णय मानण्यास स्पष्ट नकार देण्यात आला आहे. त्यांचा राज्यसभेतील अनुभव, संघटनेतील विश्वासार्हता आणि पवार कुटुंबाभोवती असलेली राजकीय पकड लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. गटनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी तातडीने आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देत घटनात्मक प्रक्रिया पूर्ण केली.

दरम्यान, बारामतीतही हालचालींना वेग आला. सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. त्यानंतर त्या काही तासांतच दिल्लीकडे रवाना झाल्या. उद्या देशाचा अर्थसंकल्प आहे. मी लोकसभेतील फ्लोअर लीडर असल्याने दिल्लीला जाणे आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी शपथविधीबाबत पूर्वकल्पना नसल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या या हालचालींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारण आणि दोन्ही गटांतील भविष्यातील समीकरणांबाबत चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या असून, हा निर्णय केवळ एका कुटुंबाचा राजकीय वारसा पुढे नेणारा नाही, तर महायुती सरकारची स्थिरता, राष्ट्रवादी काँग्रेसचे भविष्यातील नेतृत्व आणि बारामतीच्या राजकारणाची दिशा ठरवणारा निर्णायक टप्पा मानला जात आहे. मात्र हा भावनिकतेतून घेतलेला निर्णय राजकीयदृष्ट्या किती टिकाऊ ठरणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खाकी वर्दीची प्रतीक्षा संपली; पुणे पोलीस दलात भरतीची घोषणा



**पुणे, ता. १ :** पुणे शहराचा वेगाने होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या पाहता पुणे पोलीस दलावर कामाचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या पार्श्व भूमीवर पोलीस दलातील रिक्त पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया लवकरच राबवली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या अनेक म हिन्यांपासून या भरतीची प्रतीक्षा होती. आता संभाव्य तारखांबाबतही संकेत मिळाल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

सध्याच्या घडीला पुणे शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्या तुलनेत पोलीस दलातील मनुष्यबळ अपुरे असल्याचे वास्तव आहे. अंदाजे २० ते २१ हजार पोलीस अधिकारी आणि कर्मचारी आवश्यक असताना प्रत्यक्षात केवळ सुमारे १० हजार कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना सलग २४ तास ड्युटी करावी लागत आहे. याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर तसेच कौटुंबिक जीवनावर होत असल्याचे चित्र आहे. मागील वर्षात शहरात ५ नवीन पोलीस ठाणी सुरू झाल्यामुळे ही अडचण आणखी वाढली आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस भरतीसाठीची मैदानी शारीरिक चाचणी १० ते १५ फेब्रुवारीदरम्यान सुरू होण्याची शक्यता आहे. या चाचणीसाठी राज्यभरातून हजारो तरुण पुण्यात येणार असल्याने पोलीस प्रशासनाकडून नियोजन सुरू करण्यात आले आहे. मैदानांची तयारी, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केल्या जात आहेत.

ही भरती पुणे पोलीस दलासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. नव्या कर्मचाऱ्यांमुळे सध्याच्या पोलिसांवरील कामाचा ताण कमी होणार आहे. गस्त वाढवणे, गुन्ह्यांचा तपास वेळेत करणे आणि नागरिकांना जलद सेवा देणे शक्य होणार आहे. तसेच खाकी वर्दीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी ही भरती मोठी संधी ठरणार आहे.

# पार्थ पवारांच्या 'अमेडिया' कंपनीचा १८०० कोटींचा घोटाळा पुन्हा चर्चेत

## शपथविधी झाला तरी चौकशी थांबू नये

**पुणे, ता. १ :** अजित पवार यांच्या निधनानंतर अवघ्या ३ दिवसांत त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याने राज्याच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली. एका बाजूला ही राजकीय स्थैर्याची गरज म्हणून मांडली जात असली, तरी दुसऱ्या बाजूला सत्तेचा वापर करून प्रलंबित प्रकरणांवर पडदा टाकला जाईल का, अशी शंका उपस्थित केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा पार्थ पवार यांच्याशी संबंधित पुण्यातील भूखंड व्यवहाराचा मुद्दा ऐरणीवर आणला आहे.


अंजली दमानिया यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर प्रतिक्रिया देत स्पष्ट केले की शपथविधीवर त्यांचा आक्षेप नाही, मात्र सत्ताबदलाच्या नावाखाली चौकशी थांबवणे चुकीचे ठरेल. त्यांच्या मते, बिझनेस अज यूज्युअल सुरू राहणार असेल, तर पुण्यातील कथित जमीन घोटाळ्याची चौकशीही तितक्याच वेगाने पुढे गेली पाहिजे. या प्रकरणात पार्थ पवार यांच्याविरोधात FIR दाखल करण्यास विलंब होत असल्यावर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून खारगे आयोगाचा अहवाल तातडीने जाहीर करण्याची मागणी केली आहे.



या भूखंड व्यवहारात मुंढवा कोरेगाव पार्क परिसरातील सुमारे १८०० कोटी रुपये किमतीची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना खरेदी केल्याचा आरोप आहे. ही खरेदी पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीमार्फत झाल्याचे सांगितले जाते. याप्रकरणी इतर आरोपींवर गुन्हे दाखल झाले असताना मुख्य लाभार्थीवर कारवाई का नाही, हा प्रश्न जनतेमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. चौकशी सुरू असतानाच त्यांना राज्यसभेवर पाठवणे चुकीचे असल्याचे मतही दमानिया यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावरही अप्रत्यक्ष टीका केली. सुनेत्रा पवार यांच्या आसपास काही नेते संधी साधताना दिसत असल्याचा आरोप करत, राजकीय पुनरागमनाची घाई आणि सत्तेजवळ राहण्याची धडपड उघडी पडत असल्याचे त्यांनी म्हटले. हे प्रकरण केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित न राहता, सत्तेतील पारदर्शकता, चौकशी संस्थांची स्वायत्तता आणि राजकीय नैतिकतेचा कस लावणारे ठरत असल्याने त्याचे महत्त्व अधिक आहे.

# अजित पवारांच्या अंत्यस्थळी शरद पवारांची अचानक भेट; पवार कुटुंबातील निर्णायक घडामोडी



**पुणे, ता. १ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाला पाच दिवस उलटल्यानंतर बारामती आणि मुंबई या दोन्ही ठिकाणी घडामोडींना वेग आला आहे. शोकाकुल वातावरणातच राजकीय आणि कौटुंबिक पातळीवर महत्त्वाच्या हालचाली घडताना दिसत आहेत.

रविवारी सकाळी मुंबईला रवाना होण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि प्रतिभा पवार यांनी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान परिसरात भेट दिली. याच ठिकाणी अजित पवार यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते. अंत्यस्थळी पोहोचल्यानंतर शरद पवार आणि प्रतिभा पवार काही काळ थांबले. दोघेही भावूक झाल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर त्यांनी विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त किरण गुजर यांच्याशी अजित पवार यांच्या प्रस्तावित स्मृतीस्थळाबाबत सविस्तर चर्चा केली.

या भेटीला विशेष महत्त्व यासाठी आहे की, याच काळात मुंबईत सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या गटनेता आणि पक्षनेता म्हणून निवड होत होती. शरद पवार यांनी या शपथविधीबाबत आपल्याला पूर्वकल्पना नव्हती, असं सांगितल्यानंतर बारामतीतील पवार कुटुंबीयांची तातडीची बैठक झाली. या बैठकीला सुप्रिया सुळे, रोहित पवार, पार्थ पवार, युगेंद्र पवार यांच्यासह कुटुंबातील जवळचे सदस्य उपस्थित होते. या चर्चेनंतरच संध्याकाळी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पार पडला.

दरम्यान, अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाबाबत मोठी घोषणा समोर आली आहे. किरण गुजर यांनी सांगितलं की, अजित दादांचं स्मारक भव्य आणि अर्थपूर्ण व्हावं, अशी शरद पवार यांची स्पष्ट इच्छा आहे. बारामतीत आधीच विविध संकल्पनांवर आधारित वास्तू उभ्या राहिल्या असून, अजित पवार यांचं स्मारकही राज्यभरातील नामवंत वास्तुविशारदांच्या संकल्पनांमधून साकारण्यात येणार आहे.

या घडामोडी केवळ भावनिक नाहीत, तर त्यांचे राजकीय आणि सामाजिक पडसादही दूरवर उम टणारे आहेत. अजित पवार यांच्या नेतृत्वाचा वारसा, पवार कुटुंबातील भूमिका आणि राष्ट्रवादीतील पुढील दिशा- या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर बारामतीतील हे निर्णय राज्याच्या राजकारणात महत्त्वाचे ठरणार आहेत.

# अजित पवारांनंतर राष्ट्रवादीची सूत्रे प्रफुल पटेलांकडे? प्रफुल पटेल यांची अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई, ता. १ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील सत्ता समीकरणे वेगाने बदलत असून, त्यातच आता एक मोठी आणि धक्कादायक राजकीय घडामोड समोर आली आहे. केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी थेट पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत प्रफुल पटेल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याची माहिती दिली. या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली असून, राष्ट्रवादीतील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

विशेष म्हणजे, या नियुक्तीला काही तास आधीच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरून तीव्र विरोध दर्शवला होता. प्रफुल पटेल हे राष्ट्रवादीतील असे नाव आहे,



ज्यांना एकेकाळी पक्षातीलच अनेक नेत्यांचा कडाडून विरोध होता. तरीही अजित पवार यांच्या निधनानंतरच्या सत्तांतरात पक्षाची सूत्रे त्यांच्या हाती जाणे हे अनेकांसाठी आश्चर्यकारक मानले जात आहे. याआधी शरद पवार यांनीही बारामतीतील घडामोडींवर बोलताना सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्याकडे अप्रत्यक्षपणे बोट दाखवलं होतं, त्यामुळे या नियुक्तीचं राजकीय महत्त्व अधिक वाढलं आहे.


पियूष गोयल यांनी आपल्या मुलाखतीत महायुतीमधील भूमिका स्पष्ट केली. आमची राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर NCPच्या आमदारांनी एकत्र येत सुनेत्रा पवार यांची पक्षनेते म्हणून निवड केली आणि त्या उपमुख्यमंत्री झाल्या. हा निर्णय स्वागतार्ह आहे, असं गोयल म्हणाले. त्यांनी सुनेत्रा पवार यांचं कौतुक करताना त्या संवेदनशील, लोकाभिमुख नेत्या असल्याचं सांगितलं. राज्यसभा आणि बारामतीतील त्यांच्या कामाचा उल्लेख करत, त्या जनतेशी थेट जोडलेल्या नेत्या असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. अजित पवार यांच्याबद्दल बोलताना गोयल यांनी त्यांना सक्षम प्रशासक, प्रभावी लोकनेते आणि महाराष्ट्राच्या जनतेचे लाडकेनेते म्हणून श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेली राजकीय पोकळी, त्यानंतर सुनेत्रा पवार यांचा शपथविधी आणि आता प्रफुल पटेल यांची अध्यक्षपदी नियुक्ती-या सगळ्या घडामोडी राष्ट्रवादी काँग्रेसचं भवितव्य आणि राज्यातील सत्तासंतुलन नव्याने ठरवणाऱ्या ठरणार आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## पपईचा वापर केसांसाठी केल्याने काय परिणाम होतात, जाणून घ्या

पपईचे आपल्या आहाराच्या दृष्टीनेही अनेक फायदे आहेत. तसेच पपई मास्क आपण त्वचेवर सुद्धा लावू शकतो. पपईपासून आपण केवळ फेस पॅक बनवू शकत नाही तर त्यामधून केसांचा मास्क सुद्धा बनवता येईल. पपई हेअर मास्कमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. कोरड्या निर्जीव केसांसाठी हे खूपच फायदेशीर आहे.

अलीकडे तरुण वयोगटातील मुलींमध्ये केसगळतीचे प्रमाण खूपच वाढताना दिसत आहे. नवनवीन हेअर स्टाइल करून तसेच रासायनिक प्रक्रियेमुळे तरुणींमध्ये केसगळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

पपईचे आरोग्यासाठी बरेच फायदे आहेत. हे आपल्या त्वचा आणि केसांसाठी देखील फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन ए आणि सी समृद्ध आहे. ते पौष्टिक फायद्यासाठी ओळखले जातात. आपण पपईपासून फेस पॅकच तयार करू शकत नाही तर त्यापासून केसांसाठी मास्क सुद्धा तयार करू शकतो. पपई हेअर मास्कमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. कोरड्या निर्जीव केसांसाठी हे फायदेशीर आहे.

पपईचे काही ताजे तुकडे ब्लेंडरमध्ये ठेवा आणि पपईचा लगदा तयार करा. एका भांड्यात २ चमचे पपईचा लगदा घ्या आणि त्यात समान प्रमाणात नारळ तेल मिसळा. यासह आपल्या केसांवर लावावे, आणि चांगली मालिश करावी. पपईच्या केसांचा मास्क सुमारे एक तासासाठी तसेच ठेवावे. त्यानंतर सौम्य शैम्पूने केस धुवावे. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा लावावा.

पपईचा लगदा करण्यासाठी काही पपईचे चौकोनी तुकडे घ्यावेत. त्यानंतर या लगद्यापासून रस काढावा. त्यातील २ चमचे पपईचा रस घ्यावा. त्यात २ चमचे दही घाला. हे पपई हेअर मास्क केसांवर लावावे. हलक्या हाताने हळूवारपणे मालिश करा. आपले केस शॉवर कॅपने किमान ३० ते ४० मिनिटे तसेच झाकून ठेवावे. त्यानंतर सौम्य शैम्पूने केस धुवावे. हा मास्क आठवड्यात किमान एकदा केसांना लावावा.

# पुण्याची जीवनवाहिनी होणार निर्मळ; नमामी गंगेच्या धर्तीवर नमामी मुळामुठा प्रकल्पाचे संकेत

**लोणीकाळभोर, ता. १ :** पुण्याची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुळामुठा नदीच्या वाढत्या प्रदूषणाची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली असून, नमामी गंगेच्या धर्तीवर नमामी मुळा- मुठा नावाची स्वतंत्र आणि सर्वंकष नदी स्वच्छता योजना राबवण्याचा विचार सुरू असल्याचे संकेत केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील नद्यांच्या स्वच्छता व पुनरुज्जीवनाला प्राधान्य देण्यात येत असून, पुण्यातील मुळा-मुठा नदीची स्थिती चिंताजनक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लोणीकाळभोर येथे आयोजित एका कार्यक्रमापूर्वी पत्रकारांशी बोलताना चौधरी म्हणाले की, मुळा-मुठा नदीत प्रक्रिया न करता सोडले जाणारे सांडपाणी तसेच थेट नदीपात्रात टाकला जाणारा कचरा ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रदूषणाचा थेट परिणाम भूजल पातळी, शेती उत्पादन आणि नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, वेळीच उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता आहे.



या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून सर्वंकष नदी सुधार प्रकल्प हाती घेण्याची तयारी सुरू आहे. या प्रकल्पाअंतर्गत सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची क्षमता वाढवणे, बेकायदेशीर सांडपाणी जोडण्या तोडणे, तसेच औद्योगिक घटकांकडून होणाऱ्या प्रदूषणावर कठोर कारवाई केली जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेचे नियमित निरीक्षण केले जाईल. स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रशासनाच्या समन्वयातून नदीकाठच्या गावांमधून कचरा थेट नदीत टाकला जाणार नाही, यासाठी ठोस उपाययोजना राबवण्यात येणार आहेत.

मुळामुठा नदी ही केवळ पाण्याचा स्रोत नसून, पुण्याचा सांस्कृतिक व पर्यावरणीय वारसा असल्याचे चौधरी यांनी अधोरेखित केले. नदी संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून, त्यात नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि युवकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे.

दरम्यान, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी काळभोर आणि प्रशासनाकडून मुळा-मुठा नदीतील वाढते प्रदूषण व नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर टाकला जाणारा कचरा या गंभीर मुद्द्यांकडे सातत्याने लक्ष वेधण्यात आले आहे. विद्यापीठाकडून यासंदर्भात राज्य व केंद्र सरकार तसेच स्थानिक प्रशासनाशी नियमित पत्रव्यवहार करण्यात आला असून, नदी स्वच्छतेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची भूमिका विद्यापीठाने स्पष्ट केली आहे.

स्वच्छ नदी, सुरक्षित भविष्य या संकल्पनेतून मुळामुठा नदीला पुन्हा निर्मळ आणि प्रवाही बनवण्याचा संकल्प केंद्र सरकारने केला असून, या दिशेने लवकरच ठोस पावले उचलली जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

> एमआयटी एडीटी विद्यापीठ आणि प्रशासनाने कायमच मुळामुठा नदीचे वाढते प्रदूषण, तसेच नदीपात्रात मोठ्या प्रमाणात टाकला जाणारा कचरा या गंभीर विषयांकडे सातत्याने लक्ष वेधले आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून सातत्याने राज्य, केंद्र सरकार आणि स्थानिक प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मुळामुठा ही पुण्याची जीवनवाहिनी असून तिच्या रक्षणासाठी व स्वच्छतेसाठी सरकार व प्रशासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची विद्यापीठाची भूमिका आहे.
> - **डॉ. महेश चोपडे,** (कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी काळभोर, पुणे)

## अर्थसंकल्पात धोरणे, संसदेत परंपरा

**पुणे, ता. १ :** देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज (रविवारी) सकाळी ११ वाजता लोकसभेत २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. अर्थमंत्री म्हणून त्यांचा हा सलग नववा अर्थसंकल्प असून, यानिमित्ताने राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्राचे लक्ष या अर्थसंकल्पाकडे लागले आहे. अर्थसंकल्पातील आकडेवारी, कररचना, महागाई, शेतकरी, मध्यमवर्ग व उद्योग क्षेत्राला मिळणाऱ्या दिलास्यावर चर्चा रंगलेली असतानाच, यंदाही अर्थमंत्र्यांच्या पेहरावाने विशेष लक्ष वेधून घेतले आहे. प्रत्येक अर्थसंकल्पावेळी वेगवेगळ्या भारतीय परंपरेचे दर्शन घडवणारी साडी परिधान करण्याची परंपरा निर्मला सीतारमण यांनी यंदाही कायम ठेवली आहे. या ऐतिहासिक अर्थसंकल्पासाठी त्यांनी तमिळनाडूची प्रसिद्ध कांचीवरम सिल्क साडी परिधान केली आहे.

# पुण्यात शटर बंद करून सुरू होतं हुक्का पार्लर! अग्निशमन दलाने शटर तोडलं

**पुणे, ता. १ :** शहरात अवैधरित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर पोलिसांकडून सातत्याने कारवाई केली जात असली, तरी काही ठिकाणी कायद्याला चकवा देत हुक्का सुरूच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. लक्ष्मीनारायण चौकातील मोदी प्लाझा इमारतीत घडलेला प्रकार तर अधिकच धक्कादायक ठरला आहे. या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या एलडिनेरो हॉटेलमध्ये शटर पूर्णपणे आतून बंद करून गुपचूप हुक्का पार्लर चालवला जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

स्वारगेट पोलिसांना नियंत्रण कक्षामार्फत एलडिनेरो हॉटेलमध्ये हुक्का सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस पथकाने



तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तिसऱ्या मजल्यावर पोहोचल्यानंतर हॉटेलचे शटर आतून बंद असल्याचे दिसून आले. वारंवार आवाज देऊनही आतून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर अग्निशमन दलाच्या मदतीने शटरचे कुलूप तोडण्यात आले. शटर उघडताच आत सुरू असलेला अवैध हुक्का पार्लर पोलिसांच्या नजरेस पडला.

पोलिसांनी हॉटेलमध्ये प्रवेश केल्यानंतर ग्राहकांकडून रोख रक्कम घेऊन तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर दिले जात असल्याचे आढळून आले. चौकशीत हॉटेल मॅनेजर सनी परिहार याने मालकाच्या सांगण्यावरून वेटरमार्फत ग्राहकांना हुक्का दिला जात असल्याची कबुली दिली. या प्रकरणी हॉटेल मालक विकास मेहता, मॅनेजर सनी परिहार आणि हॉटेलमधील कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत पोलिसांनी २२ हजार ५६० रुपयांचा हुक्का साहित्य आणि संबंधित मुद्देमाल जप्त केला आहे. शहरात सार्वजनिक आरोग्य आणि तरुण पिढीच्या आरोग्यावर घातक परिणाम करणाऱ्या हुक्का पार्लरवर बंदी असतानाही अशा पद्धतीने शटर बंद करून व्यवसाय सुरू ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. पोलिसांची अचानक कारवाई नसती, तर हा अवैध प्रकार अजूनही सुरूच राहिला असता, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

## मुळशी तालुक्यात दिराकडून भावजयीला मारहाण

**पुणे, ता. १ :** मुळशी तालुक्यातील भुकुंम परिसरात कौटुंबिक वादातून घडलेली एक धक्कादायक घटना समोर आली असून, मोठ्या दिराने भावजयीवर गरम पाणी ओतून आणि मारहाण करून गंभीर जखमी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेत महिलेच्या पायांना भाजल्या जखमा झाल्या असून, चेहऱ्यावर मार बसल्याने डाव्या डोळ्याखालचे हाड फ्रॅक्चर झाले आहे.

खाटपेवाडी येथील रहिवासी प्रतिभा शरद पवार (वय ४५) यांनी बावधन पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार ही घटना गुरुवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास त्यांच्या घरासमोर घडली. प्रतिभा पवार घरासमोर भांडी घासत असताना त्यांचे मोठे दीर भरत निवृत्ती पवार (वय ५८) अंघोळीसाठी गरम पाण्याची बादली घेऊन तेथे आले. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये कौटुंबिक कारणावरून वाद झाला होता आणि त्याच रागातून ही घटना घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

वाद उफाळल्यानंतर आरोपीने शिवीगाळ करत धमकी दिली आणि हातातील गरम पाण्याची बादली थेट भावजयीच्या पायांवर ओतली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे त्यांच्या दोन्ही पायांना भाजले. एवढ्यावर न थांबता आरोपीने त्यांच्या डाव्या गालावर जोरात दोन चापट्या मारल्या. या मारहाणीत डाव्या डोळ्याखालचे हाड हेअरलाईन फ्रॅक्चर झाले असून, त्यांना तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावे लागले. या प्रकरणी बावधन पोलिसांनी भरत पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# वाघोलीतील बकोरी फाटा परिसरात दहशत माजवणाऱ्या गुंडांची भरचौकातून वरात

### महाविद्यालयीन तरुणाला मारहाण करणारी ‘मुन्ना पटेल’ टोळी गजाआड

**पुणे, ता. १ :** वाघोलीतील बकोरी फाटा परिसरात जुन्या वादातून महाविद्यालयीन तरुणावर हल्ला करून दहशत निर्माण करणाऱ्या गुंडांवर वाघोली पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. या प्रकरणातील आरोपींची त्याच परिसरातून धिंड काढून पोलिसांनी स्पष्ट संदेश दिला की, सार्वजनिक ठिकाणी दहशत माजवणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही.

या घटनेप्रकरणी अमन ऊर्फ मुन्ना दस्तगीर पटे (वय २५), ईशप्प ऊर्फ विशाल जगन्नाथ पंदी (वय २४), मंगेश भगवान निखाते (वय २३), जिवक संजय ओव्हाळ (वय २०), आदित्य बापू शिंदे (वय २५) आणि



ओम प्रवीण कुसाळकर (वय २०, सर्व रा. वाघोली) यांना अटक करण्यात आली आहे. या सर्व आरोपींना वाघोली पोलिसांनी बकोरी फाटा परिसरात सार्वजनिकरित्या फिरवले, ज्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

या घटनेची फिर्याद संघर्ष सुनील सातव यांनी वाघोली पोलिस ठाण्यात दिली आहे. फिर्यादी आणि त्यांचे मित्र बकोरी फाटा येथील एका गेमझोनमध्ये पुल टेबल खेळत असताना आरोपी तेथे आले. पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी संघर्ष सातव यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि परिसरात दहशत पसरवली.

वाघोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी सांगितले की, अमन ऊर्फ मुन्ना पटे आणि विशाल पंदी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी लोणीकंद पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. महाविद्यालयीन परिसरात तरुणांवर हल्ले करून आपली दहशत निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

या कारवाईमुळे वाघोली आणि परिसरातील महाविद्यालयीन तरुणांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, अशा प्रकारच्या गुंडगिरीविरोधात पोलिस यापुढेही कठोर भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

# निवडणूक काळात गावठी दारूची तस्करी उघड; उरुळी कांचनमध्ये धडक कारवाई

**उरुळी कांचन, ता. ३१ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू असताना गावठी हातभट्टीच्या दारूची बेकायदा वाहतूक सुरू असल्याचा गंभीर प्रकार उरुळी कांचन (ता. हवेली) येथील स्वरगंधार चौकात शनिवारी (ता.३१) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला आहे. निवडणूक आयोगाच्या फ्लाईंग स्क्वॉड टीमच्या भरारी पथक क्रमांक तीन ने केलेल्या धडक कारवाईत ७० लिटर गावठी दारूसह एक मोटारसायकल असा एकूण ३७हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर एका इसमाला ताब्यात घेण्यात आले आहे.

भाऊसाहेब चंद्रकांत पाथरकर (वय ४०, सध्या रा. पांढरस्थळ, उरुळी कांचन, मूळ रा. खांडज, ता. बारामती, जि. पुणे) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी सुनिल दामोदर काकडे यांनी सरकारच्या वतीने उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुनिल काकडे हे सार्वजनिक बांधकाम विभागात कनिष्ठ लिपिक




म्हणून कार्यरत आहेत. सद्य ते फ्लाईंग स्क्वॉड टीमच्या पथकाचे प्रमुख आहेत.

काकडे यांच्या नेतृत्वाखाली हे पथक निवडणूक अनुषंगाने गस्त घालत असताना, तळवडे चौकाकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका मोटारसायकलवर प्लास्टिकचे दोन कॅन दोरीने बांधलेले दिसून आले. पथकाने तत्काळ वाहन थांबवून चौकशी केली असता चालकाने उडवाउडवीची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. अधिक चौकशी व पाहणी केल्यानंतर त्या कॅनमध्ये गावठी हातभट्टीची तयार दारू असल्याचे स्पष्ट झाले.दरम्यान,या कारवाईत ७० लिटर दारू (किंमत अंदाजे ७ हजार रुपये) व होंडा शाईन मोटारसायकल (किंमत अंदाजे ३०हजार रुपये) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर आरोपी भाउसाहेब पाथरकर याच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यातणी महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (अ)(ई) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक काळात अवैध दारूविक्री व वाहतुकीवर प्रशासनाचा करडा नजरकोन असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले असून, अशा बेकायदा धंद्यांवर पुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

ही कामगिरी फ्लाईंग स्क्वॉड टीमच्या भरारी पथक क्रमांक तीनचे प्रमुख सुनिल काकडे, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार विजय जाधव, केतन धेंडे, पोलीस अंमलदार वसंत चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

## आता पुण्याच्या रस्त्यांवर सुसाट धावणं कठीण

**पुणे, ता. १ :** पुणे ग्रॅण्ड टूर या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेसाठी शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांचे रूप बदलण्यात आले होते. या स्पर्धेसाठी रस्ते अधिक गुळगुळीत करण्यासाठी गतिरोधक काढून टाकण्यात आले होते. मात्र स्पर्धा संपल्यानंतर या रस्त्यांवर वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आता पुणे महानगरपालिकेने काढलेले गतिरोधक पुन्हा बसवण्याचा निर्णय घेतला आहे. सायकलिंग स्पर्धेसाठी महापालिकेने सुमारे ७५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दुरुस्ती केली होती. या कामात चेंबर समपातळीवर आणणे, खराब रस्ते दुरुस्त करणे आणि गतिरोधक हटवणे यांचा समावेश होता. या बदलांमुळे स्पर्धेदरम्यान सायकलस्वारांना चांगला अनुभव मिळाला. मात्र स्पर्धा संपल्यानंतर गणेशखिंड रस्ता, पाषाण रस्ता, सेनापती बापट रस्ता अशा वर्दळीच्या मार्गांवर वाहनचालक अतिवेगाने वाहने चालवत असल्याचे दिसून येत आहे.

यामुळे पादचारी, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी आणि दुचाकीस्वारांना रस्ता ओलांडताना मोठी अडचण येत आहे. अनेक ठिकाणी अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात होती. नागरिकांकडून वारंवार तक्रारी येऊ लागल्यानंतर महापालिकेच्या पथ विभागाने याची दखल घेतली आहे.

महापालिकेकडून आता पुन्हा गतिरोधक बसवण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. हे गतिरोधक जुन्या पद्धतीचे नसून आयआरसी मानकांनुसार शास्त्रीय पद्धतीने तयार केले जाणार आहेत. यामुळे वाहनांचा वेग नियंत्रित राहील आणि वाहनांचे नुकसानही होणार नाही, असे महापालिकेचे म्हणणे आहे.पथ विभागाच्या माहितीनुसार ज्या ठिकाणी वाहतूक जास्त आहे आणि अपघाताचा धोका आहे, अशाच ठिकाणी गतिरोधक उभारले जाणार आहेत.

# यवत येथील सेवा रस्त्यावर धोकादायक खड्डे; अपघातांचे सत्र सुरू, तात्काळ दुरुस्तीची नागरिकांची मागणी

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १ : पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत यवत येथे असलेल्या सेवा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे. अनेक ठिकाणी लहान-मोठे खड्डे निर्माण झाल्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, सेवा रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याची जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

पुण्याच्या दिशेने येताना यवत परिसरात सेवा रस्त्याच्या सुरुवातीलाच खड्डे पडले असून, यवत पोलीस स्टेशनजवळ, तसेच



मलभारे वस्तीच्या रस्त्यालगत सेवा रस्त्याची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी मधोमधच खड्डे पडल्याने वाहनचालकांना मार्ग काढताना कसरत करावी लागत आहे.

पुणेसोलापूर महामार्ग आणि यवत गावाला जोडणारा हा सेवा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. विशेषतः सकाळी व सायंकाळी वाहतूक अधिकच वाढते. मात्र, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त झाले असून, महामार्गावरून वेगात येणारी वाहने सेवा रस्त्यावर अचानक ब्रेक लावत असल्याने मागून येणाऱ्या वाहनांना धडक बसण्याचे प्रकारही घडत आहेत.

यवत पोलीस स्टेशनसमोरील सेवा रस्ता आधीच अरुंद असून, त्यातच रस्त्याच्या मधोमध पडलेल्या खड्ड्यांमुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. रस्त्यालगत वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. मलभारे वस्तीच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याशेजारी तर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, रात्रीच्या वेळी येथे वारंवार अपघात होत असल्याचे नागरिक सांगतात.

बस चालकांची कसरत व अपघातांचे प्रमाण वाढले.. सेवा रस्त्यावरील खड्ड्यांमुळे बस चालकांनाही मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक वेळा बस खड्ड्यात आदळल्याने प्रवाशांकडून चालकांना ओरडा सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. या खड्ड्यांमुळे दुचाकी चालकांना तर मार्ग काढणे अशक्य झाले आहे. खड्ड्यात दुचाकी आदळून चालक रस्त्यावर कोसळण्याच्या घटना घडल्या असून, यात काही वाहनचालक जखमी झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत.

परिणामी वाहनांचा वेग अचानक मंदावतो आणि याच कारणामुळे अपघात व वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे.

**कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी..**

सेवा रस्त्यावरील वाहतूक कोंडी आता नित्याची झाली असून, वेडीवाकडी लावलेली वाहने परिस्थिती अधिक बिघडवत आहेत. त्यामुळे महामार्ग प्रशासनाने सेवा रस्त्याची तात्काळ व कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, तसेच रस्त्यावर बेकायदेशीरपणे उभ्या असलेल्या वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी यवत परिसरातील नागरिकांकडून होत आहे.